पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०४

**सभावृत्तांत**

दिनांक - १९/०९/२०१९ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **१९/०९/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.वैशाली जालिंदर काळभोर
५. मा.सुलक्षणा राजू धर
६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

दिनांक ०५/०९/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०३**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्याबाबत – मा.निर्मला गायकवाड , मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिं.चिं.मनपातील प्राथमिक शाळेतील इ.५ वी व इ.८वी तील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके/प्रश्नसंच मे.नर्मदा प्रकाशन यांचेमार्फत थेट पध्दतीने खरेदी करणेबाबत – मा.निर्मला गायकवाड ,मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेत प्रथम दर्शनीय भागामध्ये भारताचे संविधान लावण्याबाबत- मा.निर्मला गायकवाड, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) बालवाडी ताईंचे सेवा निवृत्तीचे वय ६५ वर्ष होणेबाबत. – मा.निर्मला गायकवाड , मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिं.चिं.मनपा शाळेतील प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांकरिता ओपेन सोर्स सॉफ्टवेअर मार्फत संगणक प्रशिक्षण देणेबाबत.- मा.निर्मला गायकवाड , मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक – ०१

दिनांक - १९/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड , मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक विद्यालयांमध्ये अंदाजे ५२,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिक प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढी बरोबर त्यांच्या सुरक्षिततेबाबत ही उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी विद्यार्थ्यांना ओळखपत्र देण्यास व होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक – ०२

दिनांक - १९/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक शाळेतील इ.५ वी व इ.८वी तील विद्यार्थी हे शिष्यवृत्ती परीक्षेसाठी बसतात. मनपा शाळेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने शिष्यवृत्ती परीक्षेसाठी लागणारी आवश्यक पुस्तके विद्यार्थी खरेदी करु शकत नाहीत. परिणामी विद्यार्थामध्ये गुणवत्ता असूनही सदर परीक्षेस लागणारी पुस्तके न मिळाल्याने मनपा शाळेतील विद्यार्थी हे शिष्यवृत्ती परीक्षेत मागे पडतात. सदर बाबीचा विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये इ.५ वी व इ. ८ वी तील सर्व विद्यार्थी मराठी, गणित, इंग्रजी हया विषयांचे सर्व शिक्षक यासाठी जास्तीत जास्त शिष्यवृत्ती अभ्याससंचिका संच खरेदी करुन गरीब , होतकरु, हुशार विद्यार्थांना ही पुस्तके प्राप्त करुन देऊन त्यांची गुणवत्ता वाढ करण्याचा मानस आहे. विधानसभा आदर्श आचारसंहिता लागण्याची शक्यता असल्याने थेट पध्दतीने मे.नर्मदा प्रकाशन मार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील प्राथमिक शाळेतील इ.५ वी व इ.८ वी तील विद्यार्थांना शिष्यवृत्ती परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके/प्रश्नसंच खरेदी करणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक – ०३

दिनांक - १९/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवंदनानुसार व त्यांनी लोकशाहीच्या हितेनुसार आज जी हया भारत देशाची

घटना ह्या महामानवाने लिहिलेली आहे. त्यांना स्मरुन या महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांमधील शिक्षकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये राज्यघटनेचे स्मरण होणे गरजेचे असून यासाठी भारतीय संविधान शाळेच्या इमारतीमध्ये प्रथम दर्शनीय भागात बसविणेकामी मान्यता देणेस व याकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक – ०४

दिनांक - १९/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

बालवाडी शिक्षीकेचे निवृत्तीचे वय वर्ष ६५ करावे या पूर्वी ज्या शिक्षिका निवृत्त झाल्यात त्या ६०व्या वर्षी निवृत्त झाल्या तशा प्रकारचा कोणताच प्रकारे ठराव झालेला नाही. बालवाडी ताई ह्या मानधनावर काम करतात. त्यामुळे त्यांचे निवृत्तीचे वय ६५ वर्ष असावे. कारण अंगणवाडी शिक्षिका ह्या ही मानधनावरच काम करतात त्यांचे निवृत्तीचे वय ६५ वर्ष आहे. तरी महानगरपालिकेतील बालवाडी शिक्षिकेचे निवृत्तीचे वय ६५ वर्ष करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक – ०५

दिनांक - १९/०९/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे १०५ प्राथमिक शाळा व १८ माध्यमिक शाळा चालविण्यात येतात. सर्व शाळांमध्ये पि.चि.म.न.पा. तर्फे विद्यार्थांना मोफत शिक्षण देण्यात येते. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागामार्फत अनेक शालेय उपयोगी व शैक्षणिक गुणवत्ता वाढ व विकासाकरिता अनेक उपक्रम राबविण्यात येतात. त्याच अनुषंगाने सर्व शाळांमध्ये संगणक उपलब्ध करून देणेत आलेले आहेत, तसेच महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक मंडळाने संगणक अभ्यासक्रम अनिवार्य केला नसल्याने सध्या पि.चि.म.न.पा. शाळेतील विद्यार्थांना संगणक शिकविला जात नाही.

आधुनिक काळाची गरज लक्षात घेता व विद्यार्थांच्या हिताच्या दृष्टीने त्यांना संगणक प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. सदर उपक्रमा अंतर्गत विद्यार्थांना Global Education & Technology Solutions मार्फत ओपेन सोर्स सोफ्टवेअर वर आधारित संगणक प्रशिक्षण देणेत येईल. सन २०१४ साली भारत सरकार ने ओपेन सोर्स सोफ्टवेअर अवलंबिणे बाबत धोरण ठरविले आहे – "*Government of India shall endeavour to adopt Open Source Software in all e-Governance systems implemented by various Government organizations, as a preferred option in comparison to Closed Source Software (CSS)*". अशा प्रकारचा ओपेन सोर्स सोफ्टवेअर वर आधारित उपक्रम महानगरपालिके तर्फे राबविणेत येत नसून स्मार्ट सिटी अंतर्गत देखील तो शिकविणेत येणार नाही. सदर उपक्रम राबविणेसाठी आवश्यक असलेले संगणक संबंधित संस्थेतर्फे उपलब्ध करून देणेत येतील. उपक्रम

राबविणेत येत असलेल्या शाळेमध्ये उपलब्ध असलेले संगणक देखील दुरुस्त करून देणेत येतील जेणेकरून विध्यार्थ्यांना त्याचा अधिकाधिक फायदा होऊ शकेल. तसेच संगणक प्रशिक्षण देणेकरीता आधुनिक, अद्यावत व वयानुरूप अभ्यासक्रम व प्रशिक्षित मनुष्यबळ सदर संस्थेतर्फे उपलब्ध करून देणेत येतील. अशा उपक्रमामुळे विद्यार्थांचा तर फायदा होईलच पण शाळेची प्रतिमा उजळणेस देखील फायदा होईल. पालकांना देखील त्याचे पाल्य संगणक प्रशिक्षण घेत असल्याचा आनंद होईल. सदर उपक्रमाचे महत्व लक्षात घेता सदर उपक्रम पि.चि.म.न.पा. प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये राबविणेकामी मान्यता देणेस व याकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(पवार मनिषा प्रमोद)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४३३/२०१९
दिनांक : १९/०९/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.